पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: est.section@sus.ac.in, registrar@sus.ac.in
NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)
आस्थापना विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२५/ 7386 दिनांक: 19 SEP 2025

प्रति,
मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर,
प्रभारी संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ०१६.

विषय- सेवाविषयक बाबींच्या माहितीबाबत.

संदर्भ- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-२०२५/प्र.क्र./२७/का.१२(सेवा) दिनांक ०९ जून, २०२५.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन पारदर्शक, गतिमान सुप्रशासनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याकरिता गुणांकनाबाबत १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम (दिनांक ६ मे, २०२५ ते दिनांक २ ऑक्टोबर, २०२५) राबविण्याकामी संदर्भिय शासन निर्णयांतील नमुद विवरण पत्र ३ मधील मुद्द्यांनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, आस्थापना विभागाशी निगडीत असलेली माहिती तयार करण्यात आली आहे.

तरी, सदरची माहिती पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर माहितीचा स्विकार व्हावा, ही विनंती.

धन्यवाद!

आपला स्नेहांकित

(डॉ. अतुल लकडे)
प्र.कुलसचिव

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## आस्थापना विभाग

## विवरणपत्र क्रमांक – ३

प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, उपक्रम, आयोग यांमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे गुणांकन (एकूण गुण १००)

(कालमर्यादा- दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२५)

**दीर्घकालीन उद्दिष्टे**

| | | |
|---|---|---|
| १ | आकृतीबंध<br>गुण १० | कार्यालयांचा आकृतीबंध सुधारीत करण्यात आला आहे का?<br><br>सद्य:स्थिती: होय — गुण: <br><br>शासनाच्या धोरणानुसार प्रस्तुत विद्यापीठाचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयास दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. |
| २ | सेवाप्रवेश नियम<br>गुण १० | कार्यालयातील एकुण संवर्गापैकी किती संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत व अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण झाली याचे प्रमाण (Unit %) (गुण १०)<br><br>टक्केवारी: ८१-१०० — गुण: <br><br>प्रमाणसंहिता १९८४ मधील तरतूदीनुसार (सेवाप्रवेश) विद्यापीठातील पदभरतीची कार्यवाही करण्यात येते. तथापि, नव्याने सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. |

**मध्यम मुदतीची उद्दिष्टे**

| | | |
|---|---|---|
| ३ | सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठता सूची प्रसिध्द करणे.<br>(गुण १०) | कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील किती संवर्गाच्या वर्षे २०२४-२५ ची जेष्ठतासूची अद्ययावत करुन प्रसिध्द केल्या आहेत? (Unit %) १० गुण<br><br>टक्केवारी: १०० — गुण: |

<table>
<tr><td></td><td></td><td>प्रस्तुत विद्यापीठास शासनाने मंजूर केलेल्या व सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या सर्व संवर्गाच्या सन २०२४-२५ ची जेष्ठतासूची अद्ययावत करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>४</td><td>पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती<br>(गुण १०)</td><td>कार्यालयात सद्यस्थितीतील पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदांचे प्रमाण (Unit %) (गुण १०)<br><table><tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr><tr><td>९८.६४</td><td></td></tr></table>प्रस्तुत विद्यापीठातील विविध संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील एकुण ७४ पदापैकी ७३ पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>५</td><td>सरळसेवा नियुक्ती रिक्त पद स्थिती<br>(गुण १०)</td><td>कार्यालयात सरळसेवा नियुक्तीमधील रिक्त पदांचे प्रमाण (Unit %) (गुण १०)<br><table><tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr><tr><td>५८.१३</td><td></td></tr></table>प्रस्तुत विद्यापीठातील विविध संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील एकुण १३६ पदापैकी ८६ पदावर सरळसेवेने नियुक्ती करण्यात आलेली आहे. उर्वरित ५० पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी शासनाकडून स्थगिती आहे.</td></tr>
<tr><td>६</td><td>बिंदूनामावली प्रमाणीकरण<br>(गुण १०)</td><td>कार्यालयातील एकुण संवर्गापैकी किती संवर्गाच्या बिंदू नामावली प्रमाणित करुन घेतल्या आहेत.? (Unit %) (गुण १०)<br><table><tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr><tr><td>६१-८०</td><td></td></tr></table>शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार संवर्गनिहाय (सरळसेवा व पदोन्नती) बिंदूनामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे.</td></tr>
<tr><td>७</td><td>अनुकंपा नियुक्ती<br>(गुण १०)</td><td>कार्यालयास अनुकंपा नियुक्ती लागू असल्यास अनुकंपा नियुक्तीसाठी एकुण उपलब्ध पदांपैकी किती पदांवर नियुक्ती देण्यात आले आहेत त्याचे प्रमाण (Unit %) (गुण १०)<br><table><tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr><tr><td>१००</td><td></td></tr></table>विद्यापीठ सेवेत कार्यरत असताना एका कर्मचारी यांचे निधन झाल्याने त्यांच्या जागी शासन मान्यतेनुसार अनुकंप अंतर्गत नियुक्ती करण्यात आली आहे.</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td>८</td>
<td>iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन व ५ कोर्स पुर्ण करणे.<br>(गुण १०)</td>
<td>१) कार्यालयातील कर्मचा-यांपैकी किती कर्मचा-यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण प्लॅटफॉर्म iGOT पोर्टलवर रजिस्ट्रेशन केले आहे. (Unit %) (गुण ०५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td></td><td></td></tr>
</table>
लागू नाही.<br>
२) कार्यालयातील कर्मचा-यांपैकी किती कर्मचा-यांनी केंद्र शासनाच्या ऑनलाईन प्रशिक्षण कोर्स पुर्ण केले आहे त्याचे प्रमाण. (Unit %) (गुण ०५)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td></td><td></td></tr>
</table>
लागू नाही.</td>
</tr>
<tr>
<td>९</td>
<td>सर्व कर्मचा-यांचे सेवापुस्तक अद्ययावत करणे व डिजिटल करणे.<br>(गुण २०)</td>
<td>कार्यालयातील एकुण किती कर्मचा-यांची किती सेवा पुस्तके अद्ययावत करुन डिजिटल करण्यात आली आहेत याची टक्केवारी (Unit %) (गुण २०)
<table>
<tr><th>टक्केवारी</th><th>गुण</th></tr>
<tr><td>१००</td><td></td></tr>
</table>
विद्यापीठ स्तरावर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात विहित नोंदी घेऊन अद्ययावत करण्यात आलेले आहेत. तथापि, शासनाने डिजिटलायझेशन संदर्भात संगणक प्रणाली (Software) अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेले नाही व तसे निर्देशही नाहीत.</td>
</tr>
</table>

(डॉ. अतुल लकडे)
प्र.कुलसचिव